महाराष्ट्र पोलीस

रामानंद नगर पोलीस स्टेशन,
जळगाव. ता.जि.जळगाव.महाराष्ट्र.
दुरध्वनी क्रमांक ०२५७-२२८२८६४

जा.क्र. /२०२५

जळगाव दि. -6 / 1 / 2026

## प्रेस नोट

**विषय – दुचाकी चोर रामानंद नगर पोलीसांचे ताब्यात चौकशीत 03 दुचाकी दिल्या काढुन.....**


**हकीकत** :- रामानंद नगर हददीत दि.02/01/2026 रोजी किरण मधुकर सुर्वे रा. मारोती पार्क शिव कॉलनी हे संध्याकाळी 06.00 वाजेचे सुमारास त्यांची 60,000/- रु.किमतीची MH-19-AY-1797 काळया रंगाची हिरो कंपनीची स्प्लेंडर दुचाकी घेवुन पिंप्राळा बाजारात आले असता, संध्या 07.00 वाजेचे सुमारास अज्ञात चोरटयाने चोरुन नेली म्हणुन CCTNS गुरनं 05/2026 BNS कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**तपास** :- मा.पोलीस अधीक्षक सो जळगाव, श्री.महेश्वर रेडडी सो, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री अशोक नखाते सो, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री नितीन गणापुरे सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांचे मार्गदर्शनाखाली तपास सुरु असतांना, रामानंद नगर पोस्टेचे गुन्हे शोध पथकास मिळालेल्या गोपनीय बातमीवरुन आरोपी नामे विक्की नंदलाल भालेराव वय-२९ रा.शंकर आप्पा नगर पिंप्राळा जळगाव व महेश राजेंद्र मेढे वय-२३ रा.रामेश्वर कॉलनी जळगाव अशांना ताब्यात घेवुन त्यांची सखोल चौकशी केली असता, नमुद दोन्ही आरोपीतांनी वरील गुन्हयाचे फिर्यादी यांची हिरो स्प्लेंडर व जिल्हा पेठ पोस्टेस दाखल गुन्हयातील हिरो स्प्लेंडर प्रो तसेच एक हिरो डिल्क्स अश्या एकुण ०३ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरुन दोन्ही आरोपीतांकडुन एकुण ०३ मोटारसायकली हस्तगत करण्यातआली आहे.

नमुद गुन्हयाचे तपासात आरोपींचा शोध घेवुन ०३ मोटारसायकलचा मुददेमाल मा.वरीष्टांचे मार्गदर्शनाखाली पोनि/राजेंद्र गुंजाळ, पोउपनि/सचिन रणशेवरे, पोह/जितेंद्र राजपुत, जितेंद्र राठोड, सुशिल चौधरी, योगेश बारी अशांनी सहभाग घेवुन उत्तम कामगिरी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपासा मा.पोनि/राजेंद्र गुंजाळ यांचे आदेशान्वये पोह/ जितेंद्र राजपुत हे करीत आहेत.

**पोलीस निरीक्षक**
**रामानंद नगर पोस्टे जळगाव.**


विकी नंदू भालेराव वय
29 वर्ष राहणार शंकर आ
प्पा नगर पलोड शाळेजव
ळ
vivo X200 FE | ZEISS
16mm f/2.2 1/33s ISO256
01/02/2026, 12:29


महेश राजेंद्र मेढे वय 2
3 वर्ष राहणार रामनगर र
ामेश्वर कॉलनी जळगाव
vivo X200 FE | ZEISS
16mm f/2.2 1/33s ISO259
01/02/2026, 12:29